**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./६६९३/२०२३ दिनांक :-१८/९/२०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

गणेशोत्सव काळातील तात्पुरते वाहतुक बदलाबाबत...

पुणे शहरात गणेश उत्सव काळात नागरिकांची मोठया प्रमाणावर गर्दी होते. त्यामुळे सुरक्षेची उपाययोजना म्हणून व रस्त्यांवरून धावणा-या वाहनांमुळे नागरिकांना असुरक्षितता निर्माण होवून त्यांचे जिवीतास धोका होवू नये तसेच पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**दिनांक २०.०९.२०२३ पासून ते गणपती विसर्जना** पर्यंत तात्पुरते स्वरुपात गर्दीची परिस्थिती पाहुन **आवश्यकतेप्रमाणे** खालीलप्रमाणे वाहतूक व्यवस्थेत बदल हे सायंकाळी **१७.०० वा.** पासून ते गर्दी संपेपर्यंत राहतील.

१. **सर्व प्रकारच्या वाहनांसाठी करण्यात आलेला वाहतूक व्यवस्थेतील बदल-**
शिवाजीनगरवरुन स्वारगेट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांनी स.गो.बर्वे चौक-जे.एम.रोड-अलका चौक-टिळक रोड किंवा शास्त्री रोडचा वापर करावा किंवा सिमला चौक-कामगार पुतळा चौक- शाहीर अमर शेख चौक -बोल्हाई चौक मार्गे नेहरु रोडचा वापर करुन सेव्हन लव्हज चौक मार्गे स्वारगेटकडे जाणाऱ्या रस्त्याचा वापर करावा. गर्दीची परिस्थीती पाहून पीएमपीएमएल बसेस या वरीलप्रमाणे वळविण्यात येतील.

२. चारचाकी वाहन चालकांना शिवाजीनगर येथून स्वारगेटला जाण्यासाठी वरील मार्गाचा वापर करता येईल. चारचाकी वाहनांना गाडगीळ पुतळा ते शाहीर अमर चौक, मालधक्का चौक, बोल्हाई चौक, नरपतगिरी चौक व पुढे नेहरू रोडने स्वारगेटकडे जाता येईल. तसेच जिजामाता चौक ते फुटका बुरज येथून उजवीकडे वळून शनिवारवाड्या पासून नदीपात्रातील रस्त्याने (चंद्रशेखर आपटेरोड) भिडेपूल जंक्शनवरुन उजवीकडे वळून केळकर रोड झेड ब्रिज जंक्शन डावीकडे वळुन गरुड गणपती चौक उजवीकडे वळून अलका चौक मार्गे इच्छित स्थळी जाता येईल.

३. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौकाकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग-** १) बाजीरावरोड, केळकर रस्त्यावरील वाहनांनी अप्पा बळवंत चौक बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळाचौक उजवीकडे वळून जिजामाता चौक डावीकडे वळून गणेश रोडने फडके हौदचौक,देवजीबाबा चौक उजवीकडे वळून हमजेखान चौक सरळ महाराणाप्रताप मार्गावरुन गोविंद हलवाई चौक उजवीकडे वळून गोटीराम भैया चौक डांवीकडे वळून शिवाजीरोडने स्वारगेटकडे

२) बाजीरावरोड,केळकर रस्त्यावरील वाहनांनी अप्पा बळवंत चौक बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळाचौक उजवीकडे वळून संताजी घोरपडे रोडने कुंभारवेस चौक मार्गे इच्छितस्थळी

**४. बेलबाग चौक ते रामेश्वर चौक हा मार्ग दिनांक- २०/०९/२०२३ रोजी पासून गणेश विसर्जन पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहील.**
**पर्यायी मार्ग :-** १)शिवाजीरोडवरील स्वारगेट कडे जाणारी मिनी पीएमपीएमएल बसेस तसेच इतर हलकी वाहने बेलबाग चौकातून सेवासदन मार्गे लक्ष्मी रोडने अलका टॉकीज चौक मार्गे टिळक/शास्त्री रोडने स्वारगेटकडे जातील.

२) शिवाजीरोडने स्वारगेटकडे जाणा-या पीएमपीएमएल बसेस ह्या स.गो.बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने टिळक चौक मार्गे टिळकरोडने स्वारगेटकडे जातील.

३)शिवाजीरोडवरुन पुणे स्टेशन, हडपसर कडे जाणा-या बसेस गाडगीळ पुतळा - कुंभारवेस - शाहिरअमर शेख चौक, बोल्हाई चौक -नेहरु रोडने इच्छितस्थळी

Scanned with OKEN Scanner

४. **नो-पार्कींग बाबत**

शिवाजी रोडवर जिजामाता चौक ते बेलबाग चौक ते रामेश्वर चौक उजवीकडे वळून मंडई ते शनिपार चौक उजवीकडे सेवासदन चौक ते आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक, आप्पा बळवंत चौक ते फुटका बुरुज चौक व जिजामाता चौक ते फुटका बुरुज चौक **या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना पार्कींगसाठी मनाई राहील. तसेच आवश्यकता भासल्यास या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशास मनाई राहील.**

गणेशोत्सवाचे काळात दिनांक २०/०९/२०२३ ते २७/०९/२०२३ या दरम्यान सायंकाळी १७.०० ते गर्दी संपेपर्यंत कुमठेकर रस्ता, सदाशिवपेठ, फडके हौद रस्ता, सिंहगड गॅरेज ते म.न.पा. कार्यशाळा चौक (नाईक रस्ता) व कोहिनुर हॉटेल ते भगवान महावीर चौक, (एम.जी.रोड) या मार्गावरील एकेरी वाहतूकीचे आदेश गरजेनुसार तात्पुरत्या स्वरुपात शिथील केले जातील.

तरी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून गणेशोत्सव शांततेने पार पाडण्यास व वाहतुक सुरळीत ठेवण्यास पुणे शहर वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

१८।९

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

Scanned with OKEN Scanner